<u>रे.मु.नं.६६१/२०२४ मधील नि.५ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश मिळण्याकरिता दाखल केला आहे.

२. वादीचे कथन-

वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द जाहीर ठराव व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला असून दावा मिळकत मौजे गळनिंब तालुका नेवासा येथील गट नंबर १५१/२/ब/१ क्षेत्र १ हे.५८ आर आकार ४ रू ३५ पैसे ज्याचे चतुर्सिमाः-

| | |
|---|---|
| पूर्वेस | रस्ता |
| दक्षिणेस | रस्ता |
| पश्चिमेस | गट नंबर १५२ |
| उत्तरेस | गटापैकी |

अशा असून प्रस्तुत मिळकतीस यापुढे सोयीकरिता 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येईल.

३. प्रतिवादी ही वादीची आत्या असून मयत मारुती नारायण शेळके हे वादीचे आजोबा होते. दावा मिळकत ही मयत मारुती नारायण शेळके यांची स्वकष्टार्जित मालकी वहिवाटीची मिळकत असून मयत मारुती शेळके यांनी मा. दुय्यम निबंधक नेवासा यांच्या कार्यालयात दि. ०९/०३/२०२० रोजी दस्त क्र.१०६६/२०२० अन्वये कायदेशीर मृत्यू पत्राप्रमाणे त्यांची अंतिम इच्छा म्हणून सदरची दावा मिळकत दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात समक्ष हजर होवून योग्य ती स्टँप डयुटी भरुन व फिटनेस सर्टीफिकेट जोडून साक्षीदारासमक्ष त्यांचा नातू म्हणजेच वादी यांचे नावात व लाभात लिहून दिले. त्यानुसार मा. कामगार तलाठी व मा. मंडळ अधिकारी यांनी सदर मृत्यू पत्रानुसार नोंद मंजूर करुन फेरफार क्र. ८१०९ हा मंजूर केला आहे. त्याचप्रमाणे वादीचे नावाची नोंद ७/१२ उता-यास झालेली असून दावा मिळकत ही आज रोजी वादीचे कब्जात आहे. मयत मारुती नारायण शेळके यांचा सांभाळ, पालनपोषण, म्हातारपणाचा औषाधोपचाराचा खर्च वादी यांनी केला असून प्रतिवादी ही तिच्या सासरी सुखाने नांदत आहे. तसेच तिने मयत मारुती नारायण शेळके यांचा सांभाळ व देखभाल केलेली नसून प्रतिवादीचा वर नमूद मिळकतीशी कुठलाही एक संबंध नाही. तसेच प्रतिवादी ही मयत मारुती शेळके यांचे मृत्यू नंतरच्या कोणत्याही धार्मिक विधीस हजर नव्हत्या. सदर फेरफार क्र.८१०९ वर नाराज होवून प्रतिवादी यांनी उपविभागीय अधिकारी नगर यांचेकडे आर.टी.एस नंबर ३०७/२०२३ चे अपील दाखल केले असून सदर अपीलाची दुतर्फा चौकशी होवून प्रतिवादीचे अपील मंजूर करण्यात आले आहे व फेरफार

नंबर ८१०९ ची नोंद रद्द करण्यात आली आहे. त्या निकालावर नाराज होवून वादी यांनी अप्पर जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडे सेकंड आर.टी. एस अपील नंबर ९५/२०२४ दाखल केले असून सदरचे अपील हे न्यायप्रविष्ठ आहे. अशी परिस्थिती असताना प्रतिवादी हे मा. कामगार तलाठी गळनिंब यांना हाताशी धरुन मृत्यू पत्राआधारे झालेली फेरफार नं.८१०९ ची नोंद रद्द करु पाहत आहेत. तसेच दावा मिळकतीला त्यांचे नाव लावून पाहत आहेत. आर.टी.एस अपील नं. ३०७/२०२४ च्या निकालाप्रमाणे उपविभागीय अधिकारी साहेब अहमदनगर यांनी वादी यांच्या मृत्यू पत्राच्या वैधतेबाबत दिवाणी न्यायालयात दाद लावुन घ्यावी असे आदेश दिले आहेत. त्यानुसार वादी यांनी आर.टी.एस रिव्हीजन नं. ३०७/२०२४ च्या निकालाच्या आधारे फेरफार नं.८१०९ वर कुठलाही फेरबदल करु नये असा अर्ज दि.२९/०४/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्याचा अंतिम आदेश होईपर्यंत प्रतिवादी यांनी मा. कामगार तलाठी यांना हाताशी धरुन कायदेशीर मृत्यू पत्राआधारे झालेली वादी यांच्या नावाची नोंद फेरफार क्र. ८१०९ हा रद्द करु नये असा तूर्तातूर्त मनाई हुकुम मिळण्याकरिता दाखल केला आहे.

४. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांनी हजर होवून निशाणी १८ वर त्यांचे म्हणणे दाखल केले असून त्यांनी प्रस्तुतच्या दाव्यातील सर्व कथन अमान्य केले असून प्रस्तुतचा दावा हा या न्यायालयात चालू शकत नाही अशी हरकत घेतली आहे. पुढे त्यांनी प्रतिवादी ही वादीची आत्या आहे हे मान्य करुन वादीचे वडील गणपत शेळके यांची प्रतिवादी ही बहिण असल्याचे कथन केले आहे. पुढे त्यांनी दावा मिळकत ही वादीच्या पुर्वजांना कुळ कायद्याने प्राप्त झाली असून ती जमीन अहस्तांतरणीय आहे व ती दावा मिळकत फेरफार नंबर १४२२ ने कुळ कायद्या अंतर्गत ३२ ग प्रमाणे मिळालेली आहे. त्यामुळे सदर मिळकत ही स्वकष्टार्जित नसून भोगवटा वर्ग २ ची जमीन आहे. मयत मारुती शेळके यांना वादीचे वडील व प्रतिवादी ही दोन अपत्ये असून त्यांचे मृत्यूनंतर दावा मिळकतीमध्ये दोघांना समान हक्क आहे तसेच दि. ०९/०३/२०२० रोजीचे मृत्यूपत्र हे कायदेशीर ठरत नाही कारण दावा मिळकत ही मयत मारुती शेळके यांची स्वकष्टार्जित मिळकत नाही तसेच फेरफार क्र. ८१०९ ची नोंद बेकायदेशीर आहे. त्याचप्रमाणे आर.टी.एस अपील नंबर ३०७/२०२३ अन्वये फेरफार क्र. ८१०९ ची नोंद रद्द झाली असून त्या विरुध्द वादीने अपील क्र. ९५२४ दाखल केला आहे. तसेच वादीने दि.१५/०३/२०२४ रोजी मा. तहसिलदार यांचेकडून दावा मिळकत वर्ग १ करून घेतली असून त्यामुळे प्रतिवादीचा दावा मिळकतीतील हक्क संपत नसल्याचे कथन करून प्रस्तुतचा अर्ज अमान्य करण्याची विनंती केली आहे.

५. प्रस्तुत प्रकरणात दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. वादीने त्याचे कथनाच्या पुष्ठयर्थ पुढील न्यायनिवाडा दाखल केला आहे-

**1.** Ashutosh Samantha Vs. Ranjan Bala Dasi 2023 BHCCO 228 (SC) Supreme Court.

प्रतिवादीने त्याचे कथनाच्या पुष्ठयर्थ कोणताही न्यायनिवाडा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

६. दोन्ही पक्षाचे कथन विचारात घेता खालील वादप्रश्न माझ्या विचाराधीन निर्माण होतात-

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ ) | वादी हे सिध्द करतो काय की, त्याचे हक्कात प्रथमदर्शनी केस आहे ? | नाही |
| २ ) | वादी हे सिध्द करतो काय की, न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय? | नाही |
| ३ ) | वादी हे सिध्द करतो काय की, तो तूर्तातूर्त मनाई हुकुम मिळण्यास पात्र आहे ? | नाही |
| ४ ) | अंतिम आदेश काय? | अर्ज नामंजुर करण्यात येतो. |

<u>**कारणमिमांसा**</u>

७. वादप्रश्न क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संबंधित असल्याने त्यांचे विवेचन मी एकत्रीत करीत आहे. प्रस्तुतचा अर्ज वादीने फेरफार क्र. ८१०९ ची नोंद रद्द करु नये या आशया संबंधी दाखल केला असून त्या अनुषंगाने वादीने सर्वप्रथम त्याच्या हक्कात मारुती शेळके यांनी केलेले मृत्यूपत्र हे कायदेशीर असून जर फेरफार क्र. ८१०९ ही नोंद रद्द केली तर त्याचे अपरिमित नुकसान होईल ही बाब अभिलेखावर आणणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने त्याचे कथनाच्या पुष्ठयर्थ अभिलेखावर दावा मिळकतीचा ७/१२ उतारा, नमुना नं. ८ अ, मृत्यूपत्र क्र. १०६६/२०२०, मयत मारुती नारायण शेळके यांचे मृत्यूपत्र, तहसिलदार यांनी केलेला अर्ज, आर.टी.एस अपील नं. ३०७/२०२३ ची आदेशाची प्रत, आर.टी.एस अपील नं. ९५/२०२४ ची प्रत, फेरफार क्र. ८१०९, दावा मिळकतीचा १९७१ चा ७/१२ उतारा, फेरफार क्र. १४२२, फेरफार क्र. १५४६, महाराष्ट्र शासन परिपत्रक, आर.टी.एस अपील नं. ९५/२०२४ मधील जैसे थे आदेश दाखल केला आहे. याउलट, प्रतिवादी यांनी प्रस्तुत प्रकरणात उपविभागीय अधिकारी यांच्या समोरील आर.टी.एस अपील नं. ३०७/२०२३, फेरफार क्र. १५४६ व १९८८ ची साक्षांकित प्रत दाखल केली आहे.

८. एकंदरित सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादीचे असे कथन आहे की, दावा

मिळकत ही मयत मारुती शेळके यांची स्वकष्टार्जित मिळकत असून त्याचे मृत्यूपत्र हे मयत मारुती शेळके यांनी वादीचे हक्कात केले आहे. त्या अनुषंगाने फेरफार क्र. ८१०९ हा दाखल झाला असून दावा मिळकत आज रोजी वादीचे कब्जात आहे. या पुष्ठयर्थ अभिलेखावर दाखल केलेल्या मृत्यूपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर मिळकत ही मयत मारुती शेळके यांची स्वकष्टार्जित होती याबाबत मृत्यूपत्रामध्ये काहीही नमूद नाही परंतु वादीने सदर मृत्यूपत्रासोबत दाखल केलेल्या ७/१२ उता-यावरुन सदरील मिळकत ही भोगवटादार वर्ग २ ची असल्याचे दिसून येते. तसेच वादीने दाखल केलेल्या फेरफार क्र. १४२२ वरुन मयत मारुती नारायण शेळके हा तुकाराम धोंडीराम शेळके यांच्या जमिनीचे कुळ असून दावा मिळकत ही कुळातून मयत मारुती शेळके यांना मिळाल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत दावा मिळकत ही वादीची स्वकष्टार्जित नसून ती कुळाने मारुती शेळके यांना मिळाल्याचे दिसून येते. पुढे आर.टी.एस अपील क्र.३०७/२०२३ च्या निकालाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरील मिळकत ही भोगवटादार वर्ग २ ची असून पूर्वपरवानगी न घेता सदर मृत्यूपत्र नोंदवण्यात आलेले आहे. अशा परिस्थितीत सदर मृत्यूपत्राचे वैधतेबाबत सक्षम दिवाणी न्यायालयात दाद मागण्याबाबत मा. उपविभागीय अधिकारी नगर यांनी आदेशित केल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत वादीने प्रथमदर्शनी दावा मिळकत ही मयत मारुती शेळके यांची स्वकष्टार्जित मिळकत असून ती मिळकत मृत्यूपत्रान्वये वादीचे ताब्यात मिळाली ही बाब प्रथमदर्शनी अभिलेखावर आणणे गरजेचे होते परंतु, असे दिसून येते की, वादीने मयत मारुती शेळके यांना मिळालेली दावा मिळकत ही स्वकष्टार्जित असल्याचे नमूद केले आहे जेव्हा की, ती मिळकत कुळाने मयत मारुती शेळके यांना प्राप्त झाली आहे. अशा परिस्थितीत मला असे वाटते की, वादी हा स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेला नाही त्यामुळे प्रथमदर्शनी केस ही वादीचे हक्कात नाही, न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने नाही व प्रस्तुतचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे कोणतेही अपरिमित नुकसान होणार नाही त्यामुळे मी वादप्रश्न क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देवून वादप्रश्न क्र.४ करिता खालील आदेश पारित करीत आहे-

<u>आदेश</u>

वादीचा अर्ज (नि.५) नामंजुर करण्यात येतो.

PRANITA RITESH SUGAONKAR

Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2024.11.25 17:31:40 +0530

दि.२१.११.२०२४ **(श्रीमती.डॉ. पी. आर. सुगांवकर)**

नेवासा. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, नेवासा.

ता.नेवासा, जि.अहमदनगर.